सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय दंडाधिकारी, मूल यांचे कार्यालय

ईमेल आयडी – sdo.mul@gmail.com दुरध्वणी क्रमांक 07174-220310

क्रमाक कावी/कलि/प्रस्तु-3/कोरोना विषाणु/2020/448 दिनांक – 27 /08/2020

संदर्भ :- 1.आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, कलम 34(C)34 (M)

2. भारतीय साथ रोग नियत्रंण अधिनियम 1897,
3. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई-32 यांची दि 13 मार्च,2020 ची अधिसुचना
4. केंद्र शासन गृह विभाग आदेश क्र 40-3/2020-DM-I(A) दि 01.05.2020.
5. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पूर्नवसन, मुंबई अधिसुचना क्र DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 02.05.2020.
6. केंद्र शासन गृह विभाग आदेश क्र 40-3/2020DM-I(A) दि 17.05.2020. दि 30.05.2020
7. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पूर्नवसन, मुंबई अधिसुचना क्र DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 17.05.2020. व दि 19.05.2020. व दि 31.05.2020. आणि 29.06.2020
8. मा.जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांचे पत्र क्र.एमएजी/कार्या-8/टे-3/साले/2020/485 दिनांक 21 मे,2020
9. **या कार्यालयाचे आदेश क्र. कावि/कलि/प्रस्तु-3/कोरोना विषाणु/2020/440 दि. 26/08/2020**
11. **तहसिलदार,मूल यांचे पत्र क्र कावि/अका/ना.ना./2020/275 दि 27.08.2020**

## सुधारित आदेश

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मूंबई दिनांक 13 मार्च,2020 च्या अधिसुचनेन्वये राज्यात कोरोना विषाणूमूळे (COVID-19) उध्दव-या संसर्गजन्य आजारामूळे आरोग्य विषयक आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली आहे. व या विषाणूमूळे उध्दवलेल्या संसर्ग रोगाच्या नियत्रंणासृतव आपत्कालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यामूळे राज्यात साथरोग अधिनियम, 1897 मधील खंड 2,3,व 4 ची अंमलबजावणी अधिसुचनेच्या दिनांकापासून लागू करून जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे. संदर्भिय पत्र क्र.8 अन्वये उपविभागीय दंडाधिकारी, मुल यांना सक्षम प्राधिकारी म्हणून प्राधिकृत केलेले आहे.

ज्याअर्थी केंद्र शासन व राज्य शासनाने मार्गदर्शक सुचना निर्गमित करून दिनांक 31 ऑगष्ट ,2020 पावेतो संपूर्ण महाराष्ट्रात लॉकडाऊन लागू राहील असा आदेश करण्यात आला आहे.

आणी ज्याअर्थी चंद्रपूर जिल्हयातील **मौजा फिस्कूटी तालूका मूल जिल्हा चंद्रपूर** या भागात कोरोना बाधीत रूग्ण आढळून आल्याने व त्यांचा प्रादूर्भाव इतर भागात पसरू नये याकरीता सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टिने तसेच प्रभागातील नागरीकांचे हित व सूरक्षेस्तव अधिकची उपाय योजना तातडीने करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी भारत सरकार आरोग्य व कूंटूब कल्याण मंत्रालय दिल्ली यांनी Novel Coronavirus Disease 2019(COVID-19) बाबत Cantaintment Plan निर्धारित केला असून त्यानुसार कोरोना विषाणूव्दारे बाधीत व्यक्ती / समुदायच्या केंद्रबिदू परिसरापर्यत नागरीकांची हालचाल / फिरणे / संपर्क या निर्बंध घालून मज्जाव करणेबावत निर्देशित केले आहे.

त्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 च्या कलम 34(C) व 34 (M) आणि फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील **मौजा फिस्कुटी तालूका मूल जिल्हा चंद्रपूर** येथील इतर भागात कोराना विषाणूचा

संसर्ग इतर नागरीकांना होऊ नये या दृष्टिने सदर भागाच्या सिमा बंद करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी **मौजा फिस्कुटी तालूका मूल जिल्हा चंद्रपूर** येथील इतर भागात कोरोना विषाणूचा संसर्ग इतर नागरिकांना होऊ नये या दृष्टिने खालीलप्रमाणे Containtment Zone निर्धारित करण्यात येत आहे. तसेच **मौजा फिस्कुटी** तालूका मूल जिल्हा चंद्रपूर येथील खालील प्रमाणे परिधीय क्षेत्राच्या सिमा पूढील आदेशापावेतो आजपासुन तात्काळ बंद करण्याचा आदेश घेण्यात येत आहे.

## Containtment Zone :- मौजा फिस्कुटी तालूका मूल जिल्हा चंद्रपूर

पूर्व :- श्री बुध्देश्वर मनीराम मानकर, यांचे घरापर्यंत

पश्चिम :- श्री. राजु बाबुराव गुरनुले, यांचे घरापर्यंत

उत्तर :- श्री संतोष काशीनाथ गोंगले, यांचे घरापर्यंत

दक्षिण :- श्री. नवनाथ पत्रु लेनगुरे, यांचे घरापर्यंत

वरिल नमूद क्षेत्रात CONTAINTMENT PLAN नुसार कार्यवाही करणेबाबत आदेशीत करण्यात येत आहे. सदर आदेशाची प्रसिध्दी देण्यासंबधाने संबधीत **पोलीस स्टेशन अधिकारी,मुल आणि तहसिलदार, मूल** यांना कार्यवाही करावी.

सदर मनाई हूकूम आदेशाचे कालावधीत उपरोक्त क्षेत्रात पूर्वपरवानगी शिवाय कोणतेही आवागमनास परवानगी असणार नाही ही पूर्व परवानगी आवश्यक सेवा पूरविणा-या धारकांना सुध्दा लागू राहील.

**चंद्रपूर जिल्हयातील मौजा फिस्कुटी तालूका** मूल या क्षेत्रात शासकीय कर्तव्यावर असलेले अधिकारी/ कर्मचारी यांना अत्यावश्यक सेवेस्तव कर्तव्य करण्याची आवश्यकता, तातडीचे वैद्यकीय कारणे तसेच , अंत्यविधी , वैद्यकिय सेवेशी संबधीत खाजगी डॉक्टर,नर्स,मेडीकल स्टोअर्स,दूकानदार, पॅथालोजिस्ट, रूग्णवाहीका यांना मूभा राहील. तसेच तहसिलदार,मूल यांचेकडून सदर प्रतिबंधीत क्षेत्रात अत्यावश्यक सेवा पूरवठाधारकांना परवाना / पासेस निर्गमित करण्यात यावे आणि सदरहू परवाना / पासेस धारकांची यादी संबधीत पोलीस स्टेशन अधिकारी मूल यांना तात्काळ दयावी. सदरहू परवाना / पासेस धारकांना आवश्यक सेवा पोलीस स्टेशन अधिकारी यांनी नेमूण दिलेल्या ठराविक वेळेत **सकाळी 09.00 ते दूपारी 2.00** या कालावधीत पूरविण्याची मूभा राहील. तसेच सदरहू अत्यावश्यक सेवा पूरवठा करतांना सामाजिक अंतर (Social Distanance ) चे व इतर आरोग्य विषयक नियमांचे पालन करण्याची जबाबदारी **तहसिलदार, मूल** यांनी त्यांचा अधिनस्त कर्मचारी यांचे मार्फत करावी.

जे वरिल आदेशांचे उल्लंघन करतील त्यांचेवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 भारतीय साथ् रोग नियंत्रण अधिनियम,1897, फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144, भारतीय दंड संहिता, 1960 चे कलम 188 व इतर संबधित कायदे व नियम यांचे अंतर्गत कारवाई करण्यात येईल.

सदर आदेश **आज दिनांक ~~26~~ 27 ऑगष्ट**, 2020 रोजी, माझे सही व शिक्केनिशी निर्गमीत करित आहे.

27/8/20

(एम.खेडकर)

उपविभागीय दंडाधिकारी तथा
Sub Divisional Magistrate, Mul
Sub Divisional Incident Commander

मूल

प्रतिलिपी- माहितीस्तव सविनय सादर,

1. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई
2. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
3. मा. जिल्हादंडाधिकारी, चंदपूर
4. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,चंद्रपूर
5. मा. पोलीस अधिक्षक, चंद्रपूर

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस रवाना,

1. जिल्हा चिकित्सक सामान्य रुग्णालय, चंद्रपूर
2. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
3. जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर
4. उपविभागीय पोलीस अधिकारी, मूल
5. तहसिलदार , मूल
6. वैद्यकिय अधिक्षक, उप जिल्हा रुग्णालय, मूल
7. संवर्ग विकास अधिकारी, पं.स. मूल
8. पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन, मुल
9. तालुका वैद्यकिय अधिकारी, मूल

(एम.खेडकर)
उपविभागीय दंडाधिकारी,तथा
Sub Divisional Magistrate, Mul
Sub Divisional Incident Commander
मूल

Fiskuti, Taluka Mul

Dt:- 27/06/2020




27/8/20

Sub Divisional Magistrate, Mul